## थोडक्यात...

### एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या पल्लवी जाधव यांचा सत्कार



( बाळासाहेब मस्के/दै.धर्मयोध्दा)

**चारठाणा -** हलविरा येथील आमचे स्नेही संगीता ताई जाधव यांची कन्या कुमारी पल्लवी जाधव यांनी एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण होऊन मुंबई मंत्रालयात महसूल सहायक पदी नियुक्ती झाल्याबद्दल आज भारतीय जनता पक्षाचे नेते नानासाहेब दादा राऊत यांच्या निवासस्थानी पल्लवी जाधव यांचा शाल पुष्पहार घालून श्रीफळ देत सत्कार करण्यात आला. यावेळी माजी जिल्हा परिषद सभापती सौ.मीनाताई राऊत,नानासाहेब दादा राऊत,पंचायत समिती सदस्य तहेसीन देशमुख,तंटामुक्ती अध्यक्ष दौलतराव देशमुख,डॉ.राजेश पोखर्णा,शिवाजीराव चव्हाण,उपसरपंच वाजेद कुरेशी,सौ.पुनमताई तमशेटे,शिवशंकर तमशेटे,दिपक भाग्यवंत,साबेर पठाण,बाबासाहेब म्हेत्रे,विशाल निकाळजे,सय्यद अर्शद,केदार,चव्हाण,सुभाष वानरे आणि पल्लवी चे वडील बबनराव जाधव,आई संगिताताई जाधव,मामा दिलीप राठोड यांच्यासह आदी मान्यवर पल्लवी ला शुभेच्छा देताना उपस्थित होते.

### ऊध्दव कंठाळे यांचा नाभिक समाजा तर्फे सत्कार




(गणेश सवणे/दै.धर्मयोध्दा)

**सेलू-** येथील उपक्रमशील शिक्षक श्री. उद्धव श्रीरंगराव कंठाळे यांना ध्येय फाउंडेशनचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित तालुकास्तरीय निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक आल्याबद्दल त्यांचा समस्त नाभिक समाज बांधवांतर्फे सन्मान करण्यात, आला.याप्रसंगी महाराष्ट्र नाभिक महामंडळाची सेलू तालुका अध्यक्ष श्री. रमेश रावजी गोरे, शहराध्यक्ष श्री. बाळासाहेब प्रधान,कर्मचारी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष श्री . सूर्यकांत जी अंभोरे,ह. भ. प. श्री. अशोक आनंद महाराज सावरगावकर,श्री संदीप राऊत श्री सदाशिव बर्वे श्री गणेश काळे उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री सूर्यकांत अंभोरे यांनी केले तर अशोक महाराज राऊत यांनी आभार मानले.

# चारठाणा येथे महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जयंती निमित्त भव्य मिरवणुक

(बाळासाहेब मस्के/ दै.धर्मयोध्दा)

**चारठाणा-** सनातन विरशैव लिंगायत समाजाचे धर्मप्रसारक क्रांतीसुर्य जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांची अक्षय तृतीया रविवार दि १९ एप्रिल रोजी जयंती महोत्सव असून त्या अनुषंगाने चारठाणा येथे विरशैव लिंगायत बांधवांच्यावतीने भव्य मिरवणुक, व्याख्यान, भारुड व भजनाचे आयोजन करण्यात आले आहे. सनातन विरशैव लिंगायत समाजाचे धर्मप्रसारक क्रांतीसुर्य जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांची जयंती अक्षय तृतीयेला साजरी केली जाते त्या अनुषंगाने प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी चारठाणा येथील विरशैव लिंगायत समाज बांधवांच्या वतीने आज अंजु महाराज कौसडीकर यांचे भारुड व चारठाणा



परिसरातील भजनी मंडळाचा भजनांचा कार्यक्रम होणार आहे. दि.१९ एप्रिल रविवार रोजी सकाळी दहा वाजता महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन संध्याकाळी इंजि.किरण कोरे सर यांच व्याख्यान व महाराजांची महा आरती होईल.व दिनांक २० एप्रिल सोमवारी सायंकाळी ५ वाजता भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे असून. क्रांतीसुर्य जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांचा जन्मोत्सव समाज बांधवांच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरा होणार असून या जन्मोत्सव कार्यक्रमासाठी महादेव शिवाचार्य महाराज (मठाधिपती कळमनुर),श्री सुर्यकांतश्वर बाबा गजमल (सोलगव्हाण),ह.भ.प. नामदेव महाराज ढवळे चारठाणकर, संस्कृत.पंडीत.शिवाप्पा खके गुरुजी,माजी आमदार मा.श्री. रामप्रसादजी बोर्डीकर, राज्यमंत्री तथा पालकमंत्री मा.सौ.मेघनादिदी साकोरे(बोर्डीकर),सौ. लता विजय वाकळे (जि.प.अध्यक्ष परभणी),श्री. प्रतापराव देशमुख (नगरआध्यक्ष जिंतूर) सौ. आयोध्या किशोर खिस्ते (पं.स.सभापती), भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते श्री. नानासाहेब राऊत,श्री. गोविंदराव थिटे(तालुकाध्यक्ष भाजपा),श्री. प्रभाकर वाधीकर, पोलिस निरीक्षक मुंजाजी दळवे, जि.प.स.सौ.सरुबाई जाधव, श्री. शशिकांत देशपांडे (महामंत्री भाजप),संदीप आप्पा लकडे (न.प.सदस्य),श्री. मनीज तोडकर जिंतूर,प.सदस्य तहेसिन देशमुख, डॉक्टर पोखर्णा,युवा नेते श्री. इंद्रजीत भैय्या घादुळ,सरपंच अनिरुध्द चव्हाण,शंकर आप्पा तरटे, उपसरपंच वाजेद कुरेशी, बापुआप्पा साळेगावकर,युवा नेते सावता राऊत,श्री.प्रा. रामेश्वर कुबडे म्हणून सर,सुभाष मोहकरे,मधुकर स्वामी, शिवशंकर नावाडे यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.चारठाणा व परिसरातील विरशैव लिंगायत बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे

# खंजीर बाळगणाऱ्यास पोलिसांनी घेतले ताब्यात

(सचिन रायपत्रीवार/ दै.धर्मयोध्दा)

**जिंतुर -** येलदरी येथील आठवडे बाजारच्या दिवशी मच्छीबाजार परिसरात सार्वजनिक रस्त्यावर धारदार खंजीर बाळगणाऱ्यास पोलिसांनी ताब्यात घेत गुन्हा दाखल केला. ही कारवाई बुधवारी (ता. १५) सायंकाळी पाचच्या सुमारास करण्यात आली. याप्रकरणी नामदेव मंचकराव डुबे (वय ३७, रा. परभणी) यांनी फिर्याद दिली असून, शेख वजीर शेख बिराम ( वय ३९, रा. हिदायतनगर, जिंतूर) याच्याविरुद्ध विविध कलमान्वये दखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीकडून सुमारे १४ इंच लांबीचा लोखंडी धारदार खंजीर जप्त करण्यात आला. या खंजीरास पिवळ्या रंगाची लोखंडी मूठ असून पाते धारदार आहे. जप्त केलेल्या मुद्देमालाची किंमत सुमारे ५०० रुपये असल्याचे सांगण्यात आले. विनापरवाना शस्त्र बाळगल्याप्रकरणी आरोपीविरुद्ध कारवाई करण्यात आली असून पुढील तपास पोलिस राठोड यांच्याकडे हवालदार सोपविण्यात आला आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक परदेशी व सहायक पोलिस अधीक्षक बेनिवाल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक विवेकानंद पाटील, सहायक पोलिस निरीक्षक श्रीधर जगताप तसेच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

Dharmayoddha.com

## "पाथरीतील जि.प. शाळा सामाजिक विकासाचे केंद्रबिंदू"; डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त १५२५ फुट भव्य रांगोळी प्रतिकृतीचे उद्घाटन



**पाथरी-** नगरीतील जिल्हा परिषद शाळा या केवळ शिक्षणाचे केंद्र नसून सामाजिक विकासाची दिशा देणारे प्रेरणास्थान ठरत आहेत, असे गौरवोद्गार मान्यवरांनी काढले. विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून या शाळांनी सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण केला असल्याचेही त्यांनी नमूद केले. येथील जि.प. केंद्रीय शाळा, अहिल्यानगर पाथरी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मुख्याध्यापक संजय उजगरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमाचे विशेष आकर्षण ठरली तीशहरातील माळीवाडा येथील आर्किटेक्ट सौ. रूपाली वाघमारे यांनी साकारलेली १५२५ फूट आकाराची डॉ. आंबेडकर यांची भव्य रांगोळी प्रतिकृती. अवघ्या २८ तासांत साकारलेल्या या मनमोहक कलाकृतीने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. या आकर्षक रांगोळीचे उद्घाटन पाथरी नगराध्यक्ष मा. आसेफ खान यांच्या हस्ते करण्यात आले. नगराध्यक्ष आसेफ खान यांनी ५,००० रुपये तर मेहराज खान यांनी २,५०० रुपयांचे पारितोषिक देऊन कलाकारांचा गौरव केला.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक संजय उजगरे यांनी केले. शाळेत राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांची माहिती देताना त्यांनी सांगितले की, या माध्यमातून स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि एकात्मतेचा संदेश समाजात पोहोचत असून सर्व स्तरांतून या उपक्रमांचे कौतुक होत आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जफर शेख, सौ. खमरूनिसा मॅडम, छाया पाईकराव, ममता पितळे, रोहिणी पितळे यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच मोईन अन्सारी, शाकेर सिद्दीकी, अमोल बोराटे, रंगनाथ विरकर, ॲड. भगवान हिवाळे, सुभाष चिंचाणे आदी मान्यवरांनी भेट देत या उपक्रमाचे कौतुक केले.

विशेष म्हणजे, ही रांगोळी प्रतिकृती तीन दिवस सर्वांसाठी खुली ठेवण्यात आली असून नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

## 'गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सानुग्रह योजना' बैठकीत २ प्रस्ताव मंजूर; कागदपत्रांच्या त्रुटींमुळे ५ प्रस्ताव नामंजूर



(गणेश जत्ती/दै.धर्मयोध्दा)

**पाथरी-** शेतकऱ्यांच्या अपघाती मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक आधार देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या 'गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सानुग्रह अनुदान योजना' अंतर्गत प्रस्ताव मंजुरीसाठी तहसील कार्यालय पाथरी येथे आज दुपारी १२ वाजता महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. तहसीलदार श्री. शंकर एन. हांदेशवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत एकूण ७ प्रस्ताव सादर करण्यात आले होते. त्यापैकी सर्व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झालेल्या २ प्रस्तावांना अंतिम मंजुरी देण्यात आली. तर अपूर्ण कागदपत्रे आणि विविध त्रुटींमुळे उर्वरित ५ प्रस्ताव नामंजूर करण्यात आले. या बैठकीस सदस्य सचिव तथा तालुका कृषी अधिकारी श्री. गोविंद कोल्हे, बीडीओ प्रतिनिधी म्हणून विस्तार अधिकारी (कृषी) श्री. संदीपान घुंबरे, आरोग्य विभागाचे प्रतिनिधी श्री. राजू गिराम, आरटीओ प्रतिनिधी श्री. शुभम अकुलवार, तसेच उप कृषी अधिकारी श्री. एस. एस. उगले यांच्यासह समितीचे इतर सदस्य उपस्थित होते. सदर योजनेअंतर्गत शेतकऱ्यांचा अपघाती मृत्यू झाल्यास त्यांच्या वारसांना महाराष्ट्र शासनाकडून रु. २ लाखांचे सानुग्रह अनुदान देण्यात येते. मात्र, लाभ मिळवण्यासाठी आवश्यक सर्व कागदपत्रांची पूर्तता करणे अत्यावश्यक असल्याचे या बैठकीत स्पष्ट करण्यात आले. प्रस्ताव मंजुरी प्रक्रियेत पारदर्शकता राखत पात्र लाभार्थ्यांना तातडीने मदत मिळावी, यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

## आई वडिलांच्या कष्टाची जाणीव विद्यार्थ्यांना करून द्यावी - समुपदेशक जयदीप पाटील

**परभणी -** कष्ट परिश्रम व मेहनत याशिवाय यश प्राप्त होऊ शकत नाही. यश प्राप्तीचे साधन म्हणजेच कष्ट आहेत. त्यासाठी विद्यार्थ्यांना अभ्यासाचे महत्त्व पटवून दिले पाहिजे. सध्याचे युग टेक्नॉलॉजीचे युग आहे. या युगात विज्ञान-तंत्रज्ञानाशिवाय पर्याय नाही. विद्यार्थ्यांचा गणित विज्ञानाचा विषयाचा पाया भक्कम करण्यासाठी फाउंडेशन हा उत्तम पर्याय आहे. विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी आयुष्य झिजवणाऱ्या आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये रुजवली पाहिजे. असे प्रतिपादन समुपदेशक जयदीप पाटील यांनी बाल विद्या फाउंडेशच्या गुणवंत विद्यार्थी सन्मान सोहळ्यात व्यक्त केले.

परभणी शहरातील येथील बाल विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित बाल विद्या फाउंडेशन च्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती व संस्थेचे माजी अध्यक्ष स्वर्गीय पांडुरंग नावंदर यांच्या जयंतीनिमित्ताने घेण्यात आलेल्या टॅलेंट सर्च परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी सत्कार व करियर मार्गदर्शन समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर नंदकुमार झरकर हे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून जळगावचे जयदीप पाटील व शिक्षणतज्ञ डॉ. महेश पाटील हे उपस्थित होते. यावेळी संस्थेचे



उपाध्यक्ष ॲड. विलास पोहेडुळकर, सचिव डॉ. विवेक नावंदर, सहसचिव ॲड. संजय देशपांडे, कोषाध्यक्ष विनय नावंदर , संस्थेचे सदस्य श्री एम. जी. विहिटकर , सौ. डॉ. अनिता विवेक नावंदर, मुख्याध्यापक अरुण बोराडे , उपमुख्याध्यापक रामदास तुम्मेवार , पर्यवेक्षक प्रदीप रूघे , बळीराम कोपरटकर , प्राथमिकच्या मुख्याध्यापिका सुनीता जाधव, बाल विद्याविहारचे विभाग प्रमुख नितीन गोराडकर, बाल विद्या वर्धिनी इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक रमेश कापसे, प्रा. डॉ. संजय मोरे, बाल विद्या फाउंडेशनचे व्यवस्थापक सुनील घुगे आदी उपस्थित होते.

तर महेश पाटील यांनी मार्गदर्शन करताना म्हणाले की, शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत. ज्ञानाच्या कक्षा रूंदावलेल्या आहेत. त्यामुळे काळाची पाऊले ओळखून संस्थेनी स्वतःमध्ये बदल घडून आणला पाहिजे. या ज्ञानाच्या युगात विद्यार्थी टिकण्यासाठी त्याला चौकस व पायाभूत ज्ञान देणे गरजेचे आहे. काळाची पावले ओळखून बाल विद्यामंदिर शिक्षण संस्थेने वेळोवेळी पाऊल उचलले आहेत. बाल विद्या फाउंडेशन हे विद्यार्थी रुपी रत्न घडवणारे ज्ञानपीठ आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडताना संस्थेचे सचिव डॉ. विवेक नावंदर विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी शिक्षक , पालक व विद्यार्थी यांचा सुसंवाद असणे आवश्यक आहे. आम्ही संस्थाचालक या नात्याने शिक्षक पालक व संस्था यांच्यात नेहमी संवाद ठेवत असतोत. होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षेत श्रृती गजानन विभुते या फाउंडेशनच्या विद्यार्थिनीने सुवर्णपदक प्राप्त करून नावलौकिक प्राप्त केला आहे. अशा स्पर्धा परीक्षा मध्ये विद्यार्थ्यांना यशस्वी करण्यासाठी सर्वोत्तम तयारी करून घेण्याचा आमचा मानस आहे. त्यासाठी आम्ही नेहमी कटीबद्ध आहोत.

प्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह प्रमाणपत्र व रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले. होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षेत सुवर्णपदक प्राप्त श्रृती गजानन विभुते हिचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष ढगे यांनी केले तर आभार अशपाक सर यांनी मानले.

## शॉर्टसर्किटमुळे उस लिंबोणी जळून खाक शेतकऱ्याचे मोठे नुकसान

(गजेंद्र साखरे/ दै.धर्मयोध्दा)

**सेलू-** देऊळगाव गात, ता. सेलू, जि. परभणी येथे शेतकरी सरस्वती भाऊराव डाके यांच्या गट क्रमांक ३२३ मधील शेतात लागलेल्या आगीत मोठे नुकसान झाले आहे. या घटनेत सुमारे दीड एकर उसाचे पीक तसेच १२० लिंबोणी झाडे पूर्णतः जळून खाक झाली आहेत. या आगीत संबंधित शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सरस्वती भाऊराव डाके यांची गावालगत असलेल्या शेतात उसाची लागवड करण्यात आली होती. त्याचबरोबर शेतामध्ये १२० लिंबोणीची झाडे देखील होती. काही दिवसांपूर्वी परिसरात आलेल्या वादळी वाऱ्यामुळे विजेचे अनेक खांब





व तारा ढासळून खाली आले होते. अनेक ठिकाणी विजेच्या तारा एकमेकांना लागण्याच्या स्थितीत असल्याचेही निदर्शनास आले होते. याच पार्श्वभूमीवर डाके यांच्या शेतातून गेलेल्या विजेच्या पोलवरील तारा एकमेकांना लागून शॉर्टसर्किट झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. या शॉर्टसर्किटमुळे ठिणग्या पडून उसाच्या शेतात आग लागली. उन्हाळ्याच्या कडक तापमानामुळे व कोरड्या वातावरणामुळे ही आग काही क्षणातच संपूर्ण क्षेत्रात पसरली. त्यामुळे दीड एकर उसाचे पीक आणि सर्व लिंबोणी झाडे आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. घटनेची माहिती मिळताच गावातील ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. मात्र आगीचा वेग अधिक असल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान टाळणे शक्य झाले नाही. या घटनेमुळे शेतकऱ्याच्या उत्पन्नावर मोठा परिणाम झाला असून आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. दरम्यान, या घटनेची माहिती महसूल विभागाला देण्यात आली असून अधिकाऱ्यांनी पंचनामा करण्यासाठी येण्याचे सांगितले आहे. मात्र अद्यापही अधिकारी घटनास्थळी पोहोचले नसल्याने पंचनामा करणे बाकी आहे. त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्याला शासकीय मदत मिळण्यात विलंब होत असल्याची भावना ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात आहे. या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, विजेच्या तारा व यंत्रणेची तात्काळ दुरुस्ती करावी तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्याला लवकरात लवकर मदत द्यावी, अशी मागणी होत आहे.

## पूर्णा शहरात उष्णतेची तीव्र लाट; पारा ४२ वर, रस्त्यांवर शुकशुकाट


(असद शेख/ दै.धर्मयोध्दा)

**पुर्णा** - एप्रिल महिन्याच्या मध्यावरच सूर्याने प्रचंड ताकद दाखवली असून, पूर्णा शहरात उन्हाचा कहर पाहायला मिळत आहे. गुरुवारी (१६ एप्रिल) शहरातील कमाल तापमानाने ४२ अंश सेल्सिअसची पातळी गाठल्याने नागरिक हैराण झाले आहेत. रस्त्यांवर पूर्ण शुकशुकाट दिसत असून, किमान तापमानही २६ अंशवर पोहोचल्याने रात्रीही उकाड्यापासून सुटका मिळत नाही. दुपारच्या वेळी प्रखर उन्हामुळे शहरातील मुख्य रस्ते, बाजारपेठा आणि निवासी भागातील गल्लीबोळ पूर्णपणे निर्मनुष्य झाले आहेत. नेहमी गजबजलेल्या



ठिकाणी आज शांतता पसरली आहे. अत्यावश्यक कामाशिवाय कोणीही घराबाहेर पडत नसल्याने शहराचे दैनंदिन जीवन काही काळ ठप्प झाल्यासारखे वाटते. सकाळी १० नंतरच उष्णतेचा चटका जाणवू लागतो आणि दुपारी १२ ते ४ या वेळेत परिस्थिती अत्यंत गंभीर होते. अंगाची लाहीलाही करणाऱ्या या उन्हामुळे रस्त्यावर चालणाऱ्यांची संख्या लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. काही ठिकाणी रस्ते पूर्णपणे ओस पडल्याचे चित्र दिसत आहे. नागरिकांनी उष्णतेपासून बचावासाठी आपल्या दिनचर्येत बदल केला आहे. आता बहुतेक जण सकाळी लवकर किंवा सायंकाळी उशिरा कामे उरकत आहेत. थंड पेये, लिंबूपाणी, ताक, उसाचा रस आणि कोल्ड ड्रिंक्सचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. डोक्यावर टोपी, गमछा किंवा कापड बांधूनच लोक बाहेर पडताना दिसत आहेत. आरोग्य तज्ज्ञांनी सांगितले की, सध्या उष्माघात (हीट स्ट्रोक) चा धोका वाढला आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि कामगार वर्गाने विशेष काळजी घ्यावी. पुरेसे पाणी पिणे, हलके आणि सैल कपडे घालणे, तसेच थेट उन्हात जास्त वेळ राहणे टाळणे आवश्यक आहे. हवामान विभागाने () पुढील काही दिवस (१६ ते १८ एप्रिल) मराठवाडा भागात उष्णतेची लाट कायम राहण्याचा इशारा दिला आहे. तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता असून, ४२-४४ अंशांपर्यंत पोहोचू शकते. या पार्श्वभूमीवर स्थानिक प्रशासनाने नागरिकांना दुपारी १२ ते ४ या वेळेत शक्यतो घराबाहेर न पडण्याचे आवाहन केले आहे. आवश्यक काम असेल तरच बाहेर पडावे आणि आरोग्याची काळजी घ्यावी, असे सांगण्यात आले आहे. एकूणच, पूर्णा शहरासह मराठवाड्यात उष्णतेची लाट तीव्र होत असून, येणारे काही दिवस नागरिकांसाठी अधिक कष्टदायक ठरणार आहेत. उष्णतेपासून स्वतःला आणि कुटुंबाला वाचवण्यासाठी सर्वांनी काळजी घ्यावी.

## सामान्य वृत्तपत्र विक्रेत्याचा मुलगा बनला डॉक्टर!



**परभणी -** येथील परभणी जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे अध्यक्ष श्री शिवाजी उर्फ अंबादास वाकोडे यांच्या मुलगा,परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर एका सामान्य कुटुंबातील मुलाने मोठं यश संपादन केलं आहे. वृत्तपत्र विक्री करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या वडिलांचा मुलगा डॉ. सोमेश छाया शिवाजीराव वाकोडे आज डॉक्टर बनला आहे, ही अत्यंत अभिमानाची बाब आहे.

अत्यंत साध्या परिस्थितीत वाढलेल्या सोमेश यांनी लहानपणापासूनच शिक्षणाला प्राधान्य दिलं. घरची आर्थिक परिस्थिती मर्यादित असतानाही त्यांनी कधीही हार मानली नाही. वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवत त्यांनी दिवस-रात्र मेहनत घेतली आणि अखेर एमबीबीएसचे शिक्षण पूर्ण करून डॉक्टर होण्याचं स्वप्न साकार केलं.

डॉ. सोमेश यांचं हे यश केवळ त्यांच्या कुटुंबासाठीच नाही, तर समाजातील सर्वसामान्य कुटुंबांसाठी प्रेरणादायी आहे. "परिस्थिती कशीही असो, जिद्द असेल तर यश नक्की मिळतं," हे त्यांनी आपल्या कर्तृत्वातून दाखवून दिलं आहे. नुकतेच तळेगाव दाभाडे पुणे येथे इंटरशिप पूर्ण करून त्याला डिग्री प्रदान करण्यात आली आहे या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत असून, वाकोडे कुटुंबावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

डॉ. सोमेश वाकोडे यांना हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा!

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिंटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्मयोध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक-शिंदे रामेश्वर गणपतराव**

DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao